## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत आवार, पुणे - ४११ ००१.

### अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम - २०१९

मा.सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपील क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र. ३०८/१६ ब दि २१.१२.२०१९ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी विशेष मोहीम राबवून अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक उमेदवारांमधून सेवा प्रवेश नियमानुसार अधिसंख्य पदाच्या अनुषंगाने रिक्त होणाऱ्या **गट - क आणि गट -ड** मधील सरळ सेवेची पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम.

### जाहिरात क्रमांक :- ०१ /२०२०

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व समन्वय अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, पुणे अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली **गट- क व गट-ड मधील** अधिसंख्य पदांच्या अनुषंगाने रिक्त होणाऱ्या सरळसेवेची पदे भरण्यासाठीची **विशेष भरती मोहीम- २०१९** अंतर्गत खालील रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक व शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सरळसेवा भरती प्रकिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असून, उमेदवारांनी जाहिरातीतील नमूद संपूर्ण माहिती / सूचना काळजीपूर्वक वाचून अर्ज खालील अनुक्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर समक्ष सादर करावेत अथवा भारतीय डाक टपालाने पाठवावेत.

### अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑफलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी | २४.२.२०२० (सकाळी १०.३० पासून)<br>४.३.२०२०(सायंकाळी ५.३० पर्यंत) |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेमध्ये परीक्षा शुल्क स्विकृतीचा धनाकर्ष अर्जासोबत सादर करण्याचा दिनांक | २४.२.२०२० (सकाळी १०.३० पासून)<br>४.३.२०२०(सायंकाळी ५.३० पर्यंत) |
| ३ | ऑफलाईन परीक्षेचे प्रवेशपत्र www.mahapwd.com या संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी | १३.३.२०२० (सकाळी ११.३० पासून)<br>२७.३.२०२० (सायंकाळी ५.३० पर्यंत) |
| ४ | ऑफलाईन परीक्षेचा संभाव्य दिनांक व वेळ | **दिनांक ५ एप्रिल, २०२०**<br>परीक्षा वेळ - सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत आणि दुपारी २.०० ते ४.०० पर्यंत |
| ५ | अर्ज सादर करण्याचा पत्ता | **कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारती आवार, पुणे - ४११ ००१.<br>दूरध्वनी क्रमांक - ०२०-२६१२२४१४.** |

मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाने/ कुरीअरने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जास झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. पोस्टाने/ कुरीअरने व अन्य यंत्रणेद्वारे पाठविलेल्या अर्जाच्या बंद पाकीटावर ठळक अक्षरात पदाचे नाव नमूद करण्यात यावे.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व समन्वय अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, पुणे अंतर्गत अनुसूचित जमातीसाठी विशेष भरती मोहीम २०१९ अन्वये भरावयाच्या पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | ०३ |
| २ | कनिष्ठ लिपिक | ०२ |
| ३ | आरेखक (श्रेणी - ३) | ०२ |
| ४ | शिपाई | ०४ |
| ५ | चौकीदार | ०१ |
| | एकूण | १२ |

**विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| • | अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेली **गट- क व गट-ड मधील** सरळसेवेची परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे किंवा अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता, सा.बां. परिमंडळ, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील, व त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही. |
| • | पदभरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता, सा.बां.परिमंडळ, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम राहील. |
| • | ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाजकल्याण, प्रकल्प अधिकारी, आदिवासी एकात्मिक विकास कार्यालयात नावे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांनी सदर भरतीच्या पदासाठीच्या लेखी परीक्षेसाठी स्वंतत्ररित्या अर्ज करणे आवश्यक आहे. |
| • | शासन निर्णय क्र. प्राणिम-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३,दि.५/६/२०१४ नुसार गट-क मधील कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या उमेदवारांची लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीकरीता या कार्यालयाच्या कागदपत्रे तपासणी समितीकडे उपलब्ध करून द्यावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही. |
| • | लेखी परीक्षेला उमेदवारांस स्वखर्चाने यावे लागेल. |

**शैक्षणिक अर्हता :-**

खालील नमूद केलेली शैक्षणिक अर्हता/अनुभव दिनांक ३१.१२.२०१९ या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **भरती करावयाचे पद** | **उमेदवाराचे वय वर्ष** | **शैक्षणिक व तांत्रिक अर्हता** |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १८ ते ४३ | १. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा (एस एस सी) उत्तीर्ण असावा.<br>२. शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारा स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण असावा किंवा आर्कीटेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक) / कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक), सिव्हिल ड्राफ्टसमन कोर्स (स्थापत्य आरेखक) ही अर्हता धारण करीत असावा किंवा शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकीमधील उच्च शैक्षणिक अर्हता धारण करीत असावा.<br>३. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| २. | कनिष्ठ लिपिक | १८ ते ४३ | १. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विद्या शाखेची पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.<br>२. मराठी टंकलेखन - ३० शब्द प्रति मिनिट.<br>३. इंग्रजी टंकलेखन - ४० शब्द प्रति मिनिट.<br>४. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ३. | आरेखक (श्रेणी - ३) | १८ ते ४३ | १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.<br>२. इंटरमिजीएट ड्रॉईंग परीक्षा.<br>३. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. |
| ४. | शिपाई | १८ ते ४३ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.<br>(अधिनियम,१९६५(१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) अन्वये) |
| ५. | चौकीदार | १८ ते ४३ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.<br>(अधिनियम,१९६५(१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१) अन्वये) |

**वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे दिनांक ३१.१२.२०१९ रोजीचे वय विचारात घेतले जाईल.**

**शासकीय सेवेमध्ये रुजू झाल्यानंतर होणारी वित्तलब्धी :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनस्तर | वेतन व इतर भत्ते |
|---|---|---|---|
| १. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | एस-८ : रु २५५०० ते ८११०० | मूळ वेतन + इतर भत्ते |
| २. | कनिष्ठ लिपिक | एस-६ : रु १९९०० ते ६३२०० | मूळ वेतन + इतर भत्ते |
| ३. | आरेखक (श्रेणी-३) | एस-७ : रु २१७०० ते ६९१०० | मूळ वेतन + इतर भत्ते |
| ४. | शिपाई | एस-१ : रु १५००० ते ४७६०० | मूळ वेतन + इतर भत्ते |
| ५. | चौकीदार | एस-१ : रु १५००० ते ४७६०० | मूळ वेतन + इतर भत्ते |

**लेखी परीक्षेचे स्वरूप :-**

| अ. क्र. | पदनाम / संवर्ग | परीक्षेसाठीचे गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यावसायिक परीक्षा | शारिरीक क्षमता चाचणी | एकूण गुण |
| १. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | २०० | --- | --- | २०० |
| २. | कनिष्ठ लिपिक | २०० | --- | --- | २०० |
| ३. | आरेखक (श्रेणी-३) | २०० | --- | --- | २०० |
| ४. | शिपाई | १०० | -- | -- | १०० |
| ५. | चौकीदार | १०० | -- | -- | १०० |

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-**

| | |
|---|---|
| १. | लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपद्धत (मार्क सिस्टिम) अवलंबली जाणार नाही. |
| २. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदाची लेखी परीक्षा इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी सामान्यज्ञान, व बुध्दीमत्ता चाचणी व पदासंबंधीचे तांत्रिकज्ञान यावर अधारीत २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त असणे आवश्यक राहील. |
| ३. | कनिष्ठ लिपिक या पदाची लेखी परीक्षा, इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्यज्ञान, पदांसंबंधीचे तांत्रिक ज्ञान, व बुद्धीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल. |
| ४. | आरेखक (श्रेणी-३) या पदाची लेखी परीक्षा इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी सामान्यज्ञान, व बुध्दीमत्ता चाचणी व पदासंबंधीचे तांत्रिकज्ञान यावर अधारीत २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त असणे आवश्यक राहील. |
| ५. | शिपाई / चौकीदार या पदासाठी मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता एकूण १०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल. |
| ६. | शासन निर्णय क्र. प्रनिम-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३ अ, मंत्रालय, मुंबई दि. २७/०६/२००८ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार लेखी परीक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांपैकी संवर्ग पदसंख्याच्या विहित पटीत गुणानुक्रमे पात्र उमेदवारांची यादी जाहीर करणेत येईल व व्यावसायीक / प्रात्यक्षिक परिक्षा चाचणी करीता पात्र राहतील. |

**परीक्षा शुल्क :-**

| अ.क्र. | पदनाम / संवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| १. | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | रु १५०.०० |
| २. | कनिष्ठ लिपिक | रु.१५०.०० |
| ३. | आरेखक (श्रेणी-३) | रु.१५०.०० |
| ४. | शिपाई / चौकीदार | रु.१५०.०० |

**टिप:-**

१. उक्त परीक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या कोणत्याही शाखेतील धनाकर्षाची (D.D.) अर्जा सोबत प्राप्त झालेल्या चलनाची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. वर दर्शविण्यात आलेले परीक्षा शुल्क हे बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.

**उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना :-**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. (वास्तव्याचे (**डोमिसाईल**) प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक)

२. सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. उमेदवाराने अर्जासोबत सक्षम अधिका-यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व जात वैधता प्रमाणपत्राची सांक्षांकित छायाप्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय नेमणुकीचे आदेश दिले जाणार नाही.

४. उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी अलीकडील काळातील एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटो खाली दर्शविलेल्या योग्य ठिकाणी स्वाक्षरी करावी. सदर पदासाठी उमेदवाराने रु.१५० /- (रु.एकशे पन्नास फक्त) परीक्षा शुल्क केवळ डीमांड ड्रॉफ्ट व्दारे भरायचे आहेत. विहीत परीक्षा शुल्क कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा पुणे येथे देय असलेला धनाकर्ष **(Demand Draft) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे किंवा Executive Engineer, Public Works Division, Pune** यांचे नावाने काढण्यात यावा.

माजी सैनिक उमेदवारांना परीक्षा शुल्क भरण्याची अट लागू नाही. मात्र त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पुर्ण केल्याचे कार्यमुक्त प्रमाणपत्राची छायांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

५. अर्जासोबत परीक्षा शुल्कचा धनाकर्ष न जोडल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

६. पोस्टाची दिरंगाई अथवा इतर कोणत्याही कारणामुळे विहीत मुदती नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता तो रद्द करण्यात येईल.

७. सदर जाहिरातीतील अर्जाचा नमुना, अर्ज भरण्याची माहिती, परीक्षेचा दिनांक, परीक्षेचे स्वरुप, बैठक व्यवस्था, निकाल घोषित करणे इ. बाबतची माहिती खात्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mahapwd.com) प्रसिध्द करण्यांत येईल. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव तसेच जातीचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, अंशकालीन प्रमाणपत्र व इतर अर्हता विषयक प्रमाणपत्रे इ. च्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात. (अर्जासोबत मूळ कागदपत्रे सादर करु नये.)

९. शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने सादर करुन, परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

१०. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक पअक-१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ दिनांक २८/०३/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

११. उमेदवारांचे अर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण असावेत. विहीत नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण असलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१२. उमेदवारांची अंतिम निवड ही लेखी परीक्षेत प्राप्त गुणांचे अनुषंगाने गुणवत्ताक्रमा नुसार केली जाईल.

१३. गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना मूळ कागदपत्रांची तपासणीकरीता बोलावण्यात येईल. उमेदवाराने कागदपत्रे तपासणीच्या वेळी मूळ कागदपत्रे, प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र मिळणे करीता सादर केलेल्या अर्जाची पावती ग्राह्य धरली जाणार नाही. कागदपत्रे छाननी /पडताळणीअंती प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास नियुक्ती दिली जाणार नाही. मूळ कागदपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेतले जाईल.

१४. शासन वित्त विभागाचा दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयानुसार शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यास नविन परिभाषीक अंशदान वेतन योजना लागू राहील. मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तिवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन)नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तित्वात असलेली भविष्य निर्वाह निधी योजना लागु होणार नाही.

१५. जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदासाठी अंतिम निवडीसाठी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना मा.न्यायालयीन आदेश, शासनाचे निर्णय, परिपत्रके, यातील निर्देशाच्या अधिन तसेच वैद्यकिय तपासणी, चारित्र्य पडताळणी इ.च्या अधिन राहून नियुक्ती दिली जाईल.

१६. जाहिरातीच्या अनुषंगाने कार्यवाही न करण्याचे व ती रद्द करण्याचे अधिकार मा.अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, पुणे यांनी राखून ठेवला आहे.

ऑफ लाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

१७. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

उपरोक्त पदांच्या परीक्षेच्या अनुषंगाने निर्माण होणारी कागदपत्रे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कायद्याअंतर्गत संबंधित जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सहा महिने उपलब्ध असतील. सहा महिन्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्यांचे मान्यतेने नष्ट करण्यात येतील व त्यानंतर या संबंधीची कोणतीही माहिती **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये** उपलब्ध होणार नाही.

**अंतिम निवड :-**

**१) पात्र उमेदवारांच्या अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.**

अ) उमेदवाराची अंतिम निवड मिळालेल्या एकूण गुणांच्या गुणानुक्रमाच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी [Position] दोन किंवा अधिक उमेदवारांना **समान गुण मिळाल्यास** खालील प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१. अर्ज सादर करण्याच्या दिनांक ३१.१२.२०१९ रोजी उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे उमेदवार,

२. शारीरिक दृष्टया अपंग असलेले उमेदवार,

३. माजी सैनिक असलेले उमेदवार,

४. स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य असलेले उमेदवार,

५. वय (वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरती लागेल )

**२)** अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने सादर केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे व शासन निर्णयाच्या अटीची सबंधीत नियुक्ती अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करुन पुर्तता झाल्यानंतरच नियुक्ती देण्यात येईल.

**(नि.अ. तेलंग)**
सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता,
पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग,
पुणे ४११ ००१.

**प्रत :** मा. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व समन्वय अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम परिमंडळ, पुणे - ४११ ००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.

# अर्जाचा नमुना

## गट - क आणि ड संवर्गातील केवळ अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्रधारक व अर्हताप्राप्त उमेदवारांसाठी सरळसेवा भरती प्रक्रिया सन २०१९.

उमेदवाराचा पासपोर्ट साईस फोटो कवुन फोटोवर राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित करुन घेणे.

**अर्जाचा नोंदणी क्रमांक** (कार्यालयीन वापराकरीता) [ ]

(अर्जदाराची सही)

## अर्जाचा नमुना

**________________ या पदाकरिता अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्तीसाठी आवेदन पत्र**

**प्रति,**
कार्यकारी अभियंता,
पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग,
सेंट्रल बिल्डींग आवार, **पुणे - ४११ ००१.**

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नांव<br><br>Candidates full Name | ..............................................<br>(आडनांव) (स्वत:चे नांव ) ( वडीलांचे/ पतीने नांव)<br>..............................................<br>(Surname) (First Name ) (Father /Husband's Name) |
| २. | लिंग (लागू नसेल ते खोडावे) | पुरुष / स्त्री |
| ३. | उमेदवाराचा कायमचा पत्ता (पिनकोड सह) | |
| ४. | पत्रव्यवहाराचा सध्याचा संपुर्ण पत्ता (पिनकोड /दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक / ई-मेल आयडीसह) | |
| ५. | जन्म दिनांक ( जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील नोंदीनुसार) | |
| ६. | दिनांक **३१.१२.२०१९** रोजीचे वय. | ..............वर्ष ....................महिना................दिवस |
| ७. | उमेदवार मागासवर्गीय आहे काय ?<br>( लागू नसेल ते खोडावे )<br>(अनुसूचित जमातीचाच उमेदवार असावा) | होय /नाही |

| | | |
|---|---|---|
| ८. | उमेदवार विवाहीत आहे काय ?<br>(विवाहीत असल्यास लहान कुंटूब असल्याचे नमुना अ मधील प्रमाणपत्र आवश्यक आहे) | होय / नाही |
| ९. | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय?<br>(लागु नसेल ते खोडावे ) | होय / नाही |
| १०. | अर्जासोबत बँक डिमांड ड्राफ्ट /पोस्टल ऑर्डर जोडले असल्यास त्याचा क्रमांक व दिनांक व रक्कम नमुद करावी. | होय / नाही |

**शैक्षणिक अर्हता /पदाकरीता आवश्यक अर्हता**

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | शाळेचे /बोर्डाचे / संस्थेचे विद्यापीठाचे, नांव | मिळालेले गुण ( टक्के) | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | **स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक**<br>१. उमेदवार माध्यमिक शालांत परीक्षा.<br>२. शासकीय तांत्रिक संस्थेकडील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्ष मुदतीचा पाठयक्रम परीक्षा.<br>३. आर्कीटेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशास्त्रीय आरेखक)/कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक).<br>४. सिव्हिल ड्राफ्टसमन कोर्स (स्थापत्य आरेखक) अर्हता.<br>५. शासनमान्य स्थापत्य अभियांत्रिकीमधील उच्च शैक्षणिक अर्हता.<br>६. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा प्रमाणपत्र. | | | |
| २ | **कनिष्ठ लिपिक**<br>१. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा.<br>२. पदवी प्रमाणपत्र.<br>३. टंकलेखन - इंग्रजी / मराठी महाराष्ट्र राज्य<br>४. उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा प्रमाणपत्र. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **आरेखक (श्रेणी-३)**<br>१. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.<br>२. इंटरमिजीएट ड्रॉईंग परीक्षा.<br>३. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र. | | | |
| ३ | **शिपाई / चौकीदार**<br>माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा. | | | |
| ४ | इतर शैक्षणिक पात्रता. | | | |
| ५ | शासकीय कामाचा अनुभव असल्यास, प्रमाणपत्र. | | | |
| ६. | सेवायोजन कार्यालयात नोंदणी आहे काय ? असल्यास, सेवायोजन कार्यालयाचे नाव व नोंदणी क्रमांक. | होय /नाही<br>सेवायोजन कार्यालयाचे नांव -<br>नोंदणी क्रमांक : | | |
| ७. | केंद्र शासकीय /राज्य शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे नियुक्ती प्राधिकारी यांचे मार्फत अर्ज सादर केले आहेत काय ? ( कार्यरत कार्यालयाचे नांव ) | होय/ नाही/ लागू नाही | | |
| ८. | **अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांच्या साक्षांकित प्रत जोडल्या आहेत काय ?** | | | |
| १ | परीक्षा शुल्क भरल्याबाबतचे चलन. | | | |
| २ | एस.एस.सी./एच.एस.सी. बोर्डाचे प्रमाणपत्र /पदवी प्रमाणपत्र. | | | |
| ३ | महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असल्याचा दाखला. (Domicile Certificate) | | | |
| ४ | जन्म तारखेचा दाखला. | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जात/ जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र. | | |
| ६ | अनुभव प्रमाणपत्र. (असल्यास) | | |
| ७ | विवाहीत /विवाहीत असल्यास लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ( नमुना अ नुसार) | | |
| ८ | उमेदवार शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुखाची परवानगी. | | |
| ९ | सेवायोजन कार्यालयाचे पंजीकृत कार्ड | | |

**दिनांक :-** **अर्जदाराचे नाव व सही**

**ठिकाण :**

# प्रतिज्ञापत्र

**मी** प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करते / करतो की, वरील संपूर्ण माहिती माझ्या माहितीप्रमाणे अचुक आहे. यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यास, माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास, माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. नियुक्तीनंतर वित्त विभाग शासन निर्णय क्र. अनियो १००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५ च्या परिभाषित अंशदान योजनेच्या तरतुदी मला मान्य राहतील. तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र एप्रिल २८, २००५ मध्ये नमुद केलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

**दिनांक :-**

**ठिकाण :** **अर्जदाराची सही व नांव**

**प्रतिज्ञापत्र**

**नमुना - "अ"**

**( नियम ४ पहा )**

मी, श्री/ श्रीमती/कुमारी ______________________________

श्री. ______________________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी.

वय__________ वर्षे, राहणार______________________________

______________________________

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते /करतो की, (१) मी ______________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला __________ ( संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक____________ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ____________ आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.३.२००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** **(अर्जदाराची सही)**

**स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ लिपिक, शिपाई, चौकीदार**
**या पदाचे परीक्षेकरीता उमेदवाराचे ओळखपत्र / प्रवेशपत्र.**

| पासपोर्ट आकाराचा फोटो |
|---|

**पदाचे नांव** ______________________________

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव .. .. : ______________________________

२) परीक्षेचा आसन क्रमांक .. .. : ______________________________

३) परीक्षा केंद्राचे नांव .. .. : ______________________________

______________________________

४) परीक्षेचा दिनांक व वेळ .. : ______________ ______________

६) उमेदवाराची नमुना स्वाक्षरी .. : ______________________________

**उमेदवाराचे नांव व सही**

**महत्वाची सूचना :**

१. उमेदवाराने फोटो राजपत्रित अधिकारी / विशेष कार्यकारी अधिकारी किंवा शाळेचे मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

२. परीक्षेचा आसन क्रमांक, परीक्षा केंद्र व परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतचा तपशिल www.mahapwd.com या संकेतस्थळावर पाहून ओळखपत्रावर उमेदवाराने नोंदवावा.

३. हे मूळ परीक्षेचे ओळखपत्र उमेदवारास परीक्षा केंद्रावर लेखी परीक्षेचे वेळी जमा करणे बंधनकारक असल्यामुळे या ओळखपत्राची अतिरिक्त झेरॉक्स प्रत उमेदवाराने स्वत: जवळ ठेवावी.

**ठिकाण :**

**दिनांक :** **प्राधिकृत अधिकाऱ्याची सही**